## प्रतिवादीतर्फे उलटतपास श्री. डी. डी. आजगेकर वकील यांचे मार्फत.

**१४.** मी दाव्यासोबत जोडलेल्या नकाशात दाखविलेल्या जागेची शासकीय मोजणी केलेली नाही. मी दावा नकाशात दाखविलेली अतिक्रमित जागा सरकारतर्फे मोजलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यासोबत खोटा नकाशा जोडला आहे. मला बसाप्पा डांग किंवा काळव्वा हिने वीरभद्रला केव्हा दत्तक घेतले होते याबाबत सांगता येणार नाही. मी त्यांचे दत्तकपत्र पाहिलेले नाही.

**१५**. हे म्हणणे खरे नाही की, बसाप्पा आणि काळव्वा यांनी माझ्या वडिलांना दत्तक घेतलेले नाही. आज–याचा सिटी सर्वे १९७४ साली झाला आहे. त्यावेळी माझ्या व प्रतिवादींच्या मिळकतीला एकत्रीतपणे सर्वे क्र. १७९ दिलेला होता. सर्वे क्र. १७९ मध्ये विराप्पा काशाप्पा चराटी यांचा खरेदीपत्राप्रमाणे हिस्सा होता. खरेदीपत्र क्र. ६१० प्रमाणे विराप्पा हा सर्वे क्र. १७९/ब चा वहिवाटदार आहे. माझ्या वडिलांना विराप्पाने प्रतिवादीला करुन दिलेल्या खरेदीखताची माहिती होती.

**१६**. दावा मिळकतीमध्ये विहिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी दि. २६.०५.१९९६ रोजी विहिरीमधील पाणी घेण्याचा प्रतिवादीला लेखी करार करुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे प्रतिवादीला दावा मिळकतीला विहिरीतून पाणी घेण्याचा हक्क आहे. प्रतिवादीने त्याच्या मिळकतीच्या पाठीमागील सर्वे क्र. १७९/अ व ब च्या दरम्यान सुरक्षाभिंतीचे बांधकाम केलेले आहे. प्रतिवादीने बांधलेल्या सुरक्षाभिंतींना माझ्या विहिरीकडे जाणा–या बाजूला लोखंडी दरवाजा बसविलेला आहे.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांनी आणि प्रतिवादीने सन १९९७ साली सर्वे क्र. १७९ ची मोजणी करुन फिल्ड पाडून घेतले होते. सर्वे क्र. १७९/ब मध्ये प्रतिवादीचा ताबा आहे. मला फिल्ड पाडताना संबंधित अधिका–याने माझ्या वडिलांचा जबाब घेतल्या बाबत माहिती नाही. माझ्या ताब्यातील सर्वे क्र. १७९/अ मधील वहिवाटीस प्रतिवादीने कधीही अडथळा केलेला नाही. सन १९९७ नंतर सर्वे क्र. १७९ च्या नकाशाला मी किंवा माझ्या वडिलांनी आव्हानित केलेले नाही.

**१८**. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घराच्या पुर्वेला सन २००२ पुर्वी बाथरुमचे बांधकाम केलेले आहे. माझ्या घराच्या पाठीमागे सन १९९६ साली बाथरुमचे बांधकाम झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने सन २००२ मध्ये ग्रामपंचायतीकडून परवानगी घेऊन त्याच्या जुन्या घराच्या मागे नवीन घराचे बांधकाम केले आहे. माझ्या व प्रतिवादीच्या जुन्या घरामध्ये सामाईक भिंत आहे. आमच्या दोघांच्या वरच्या मजल्याच्या घराचे छप्पर समांतर आहे.

**१९**. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला सन २००२ मध्ये त्याच्या घराच्या भिंतीचे जुन्या हद्दीवरती बांधकाम करु दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीच्या घराच्या उत्तर दिशेच्या भिंतीकडे जाणीवपूर्वक अतिक्रमण केले आहे. मी कथन करीत असलेल्या अतिक्रमणा बाबत सरकारी मोजणी केलेली नाही. आता मला दाखविलेले फोटो माझ्या व प्रतिवादीच्या घराच्या पाठीमागील बाजूचे आहेत. प्रतिवादीच्या वरच्या मजल्याच्या घरावरील पावसाचे पाणी समोरील स्लॅबवरती पडत आहे. माझ्या बाजूच्या फोटोमध्ये पावसाचे पाणी माझ्या खालच्या घरावरती पडत आहे. साक्षीदाराने दोन्ही फोटो मान्य केल्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि. क्र. ८५ व ८६** देण्यात येतात.

**२०**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या घरावरील पावसाचे पाणी माझ्या घरामध्ये पडत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि. ३०.०६.२०१४ रोजी प्रतिवादीला वकिलां मार्फत खोटी नोटीस पाठवली आहे. मी दिलेल्या नोटीसीला प्रतिवादीने उत्तर दिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला माझ्या वडिलांसोबत केलेल्या करारनाम्या प्रमाणे पाणी घेण्यास अडथळा केला आहे. प्रतिवादीने पाणी घेण्यास अडथळा केल्याबाबत माझ्या विरोधात पोलिसांकडे तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीने पोलिसांकडे तक्रारी दिल्यामुळे त्याला त्रास देण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा नकाशात दाखविल्याप्रमाणे कोणतेही अतिक्रमण केलेले नाही.

**प्रश्न** – मोजणी क्र. ४३/२०२२ प्रमाणे चुकीची मोजणी झाली आहे ?

**उत्तर** – सदर मोजणी अर्धी बरोबर असून अर्धी चुकीची आहे.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा दावा दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE
Date: 2024.07.01 17:10:09 +0530

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०१.०७.२०२४.

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.